# महाराष्ट्र राज्य पोलीस बिनतारी संदेश विभाग
# प्रसिध्दीपत्रक माहे फेब्रुवारी - २०१८

**क्र. क / ५ / प्रसिद्धीपत्रक / ०२ / २०१८** **दिनांक :- २२ /०३/२०१८**

---

१. ***नेमणूक / सेवासमाप्ती*** **:- निरंक**

२. ***पदोन्नती / पदावनती*** **:- निरंक**

***३. सेवानिवृत्ती / स्वेच्छासेवानिवृत्ती :-***

***१.*** श्री. मुकुंद सुकलाल खैरनार, पोलीस उप-अधिक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) नेमणुक महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांना दिनांक १७/०१/२०१८ रोजी वयाची ५८ वर्षे पुर्ण होत असल्यामुळे, ते इकडील कार्यालयीन जा.क्र. ई-२/प्रलि-२/अधि/कर्म/से.नि/२०१८/२०१७/५५६७ दि. ०८/११/२०१७ आदेशान्वये व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम क्र. ६२(१) नुसार, दिनांक ३१.०१.२०१८ रोजी कार्यालयीन वेळेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यांना नियमानुसार असलेले सेवानिवृत्तीचे सर्व फायदे काही शासकीय येणे असल्यास ती वजाती करुन त्यानंतर अनुज्ञेय आहेत.

श्री. मुकुंद सुकलाल खैरनार, पोलीस उपअधिक्षक, बिनतारी संदेश ( अभियांत्रिकी) नेमणुक महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांना दिनांक ३१.०१.२०१८ रोजी कार्यालयीन वेळेनंतर सेवामुक्त करण्यात यावे. त्यांचे नाव दिनांक ०१.०२.२०१८ पासून हजेरी पटावर व इतर शासकीय अभिलेखावरुन कमी करण्यात यावे. तसेच त्यांचे कडील शासकीय ओळखपत्र जमा करुन घेण्यात यावे व तसा अहवाल इकडील कार्यालयास सादर करणेस विनंती आहे.

श्री. मुकुंद सुकलाल खैरनार, पोलीस उप-अधिक्षक, बिनतारी संदेश ( अभियांत्रिकी ) नेमणुक महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांचे सेवानिवृत्तीमुळे पोलीस उप-अधिक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी ) महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. के.डी.उतळे , पोलीस उप-अधिक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचेकडे पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात येत आहे.

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था -१/ प्रलि -२/पोउपअधी/निसेनि/२०१८/ ७१८ दि. ३०/०१/२०१८ )**

**२.** श्री. विलास शंकर सावंत, चालक पोलीस हवालदार नेमणुक मोटार परिवहन विभाग, बिनतारी संदेश, पुणे (संचालक आस्थापना, पुणे) यांना दिनांक १६/०३/२०१८ रोजी वयाची ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन ) नियम १९८२ मधील नियम ६२ (१) नुसार श्री. सावंत यांना दिनांक ३१/०३/२०१८ रोजी मध्यान्होत्तरपासून नियत वयोमानाने सेवानिवृत्त करण्यात येत आहे. श्री. सावंत यांना नियमानुसार लागू असलेले सेवानिवृत्तीनंतरचे सर्व फायदे, काही शासकीय येणे वसूली असल्यास ती वजाती करुन अनुज्ञेय आहेत.

श्री. सावंत यांना दिनांक ३१/०३/२०१८ रोजी मध्यान्होत्तर सेवामुक्त करण्यात यावे आणि त्यांचे नाव दिनांक ३१/०३/२०१८ रोजी मध्यान्होत्तरपासून हजेरीपट व इतर तत्सम शासकीय अभिलेखावरुन कमी

करण्यात यावे आणि त्यांचेकडील ओळखपत्र व कुटूंब आरोग्य योजनेचे कार्ड जमा करुन घेण्यात यावे. तसेच ते शासकीय निवासस्थानात राहत असल्यास, मुदतीत शासकीय निवासस्थान रिक्त करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येऊन पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

श्री. सावंत यांचेविरुध्द प्राथमिक / विभागीय कार्यवाही प्रलंबति किंवा प्रस्तावित असल्यास, त्याचप्रमाणे न्यायालयीन प्रकरण चालू असल्यास त्याबाबतची माहिती या कार्यालयास तात्काळ कळवावी. त्याचप्रमाणे त्यांचे आजारी / गैरहजर प्रलंबित असतील तर सदर प्रकरणे सत्वर या कार्यालयास सादर करावीत.

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था -२/ निवसेनि/चापोहवा सावंत /२०१८/ १२२१ दि. ०७/०२/२०१८ )**

***४. बदली :-***

**बदलीस स्थगितीः-**

पोलीस अधिक्षक बि.सं. पश्चिम विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. आशा/२०/पोना कम/ससाब/२०१७/१०६४/२०१७ दि. २०/०५/२०१७ अन्वये, धुळे येथील दिनांक ०१/०१/२०१८ पासून रिक्त होणा-या पदावर श्री. लोटन धर्मा पाटील, पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस ) नेमणुक बि.सं.वि. नंदूरबार यांची विनंतीवरुन नंदूरबार ते धुळे अशी बदली करण्यात आलेली आहे.

२. श्री. लो. ध. पाटील यांनी ते दिनांक ३१/०३/२०१८ रोजी सेवानिवृत्त होत असुन व्यक्तीगत कारणास्तव सदरची बदली रद्द होण्याची विनंती केली आहे.

३. श्री.लो.ध. पाटील, पोना (कर्मशाळा मदतनीस ) यांचे विनंतीवरुन ते सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांची धुळे येथे झालेल्या बदलीस स्थगिती देण्यात येत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई -४/आस्था -२/ वि.बदली/पोना(कम) पाटील/२०१८/८१४ दि. ०५/०२/२०१८ )**

***५. बक्षिस :***

१. कामगिरीचा तपशील :- खालील नमूद कर्मचारी यांनी स्वीय सहायक कक्षातील काम पीएआर/गोपनीय अहवालाची कामे,महत्वाची कामे वेळेत पूर्ण केली. तसेच संचालक,पो.बि.सं.म.राज्य,पुणे यांनी आदेशित केलेप्रमाणे इतर वैयक्तिक पत्र व्यवहाराची कामे कार्यालयीन वेळेपेक्षा जास्त वेळ थांबून व्यवस्थितरित्या केल्याबाबत त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस मंजूर करणेत येत आहे.

| अ. क्र. | नांव | हु-१ | नेमणूकीचे ठिकाण | मानधन रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती आर.पी.पवार | पोहवा/बियंचा | "क" शाखा, संचालक कार्यालय पुणे | रु.५००/- व जीएसटी |

२. कामगिरीचा तपशील :- खालील नमूद कर्मचारी यांनी सन २०१७ च्या प्रजासत्ताकदिनी, स्वातंत्र्यदिनी प्रदान करण्यात येणा-या राष्ट्रपतींचे पोलीस पदकाकरिता तसेच पोलीस महासंचालक, यांचे १ मे २०१७ रोजी प्रदान करण्यात येणारे सन्मानचिन्ह करिता पो.बि.संदेश विभागातील पोलीस अधिकारी कर्मचारी यांची माहिती झोनल तसेच इतर कार्यालयाकडून मागविणे तसेच प्राप्त झालेल्या माहितीची तपासणी करुन अचुक विवरणपत्र तयार करुन अल्प काळात समितीपुढे ठेवणे व माहिती पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे कार्यालयास वेळेत

सादर करण्याचे महत्वाचे व गोपनीय कामकाज केले व इतर महत्वाची गोपनीय कामे व्यवस्थितरित्या केल्याबाबत त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस मंजूर करणेत येत आहे.

| अ. क्र. | नांव | हु-I | नेमणूकीचे ठिकाण | मानधन रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती आर.पी.पवार | पोहवा/बियंचा | "क" शाखा, संचालक कार्यालय पुणे | रु.५००/- व जीएसटी |
| | | | एकुण | रु.५००/- |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७ / ७०६ / बक्षिस / २०१८ /१०८१, दि.२६/०२/२०१८)**

***६. शिक्षा :-***

1) गैरशिस्त, बेफिकिर व आत्यंतीक निष्काळजी वर्तणूक यात मपोहवा/यंचा/श्रीमती वर्षा सुरेश साळुंखे, नेमणूक पोलीस अधीक्षक, बीड यांनी खालीलप्रमाणे आपल्या कर्तव्यात कसूरी केली असल्याचे दिसून आले आहे.

**१.** दिनांक ०३/०७/२०१२ ते १६/०३/२०१५ पर्यत ९८७ दिवस आपल्या कर्तव्यावर विनापरवाना गैरहजर राहिला आहात.

**२.** बेशिस्त व बेकायदेशिररित्या गैरहजर राहून गैरहजर कालावधीमध्ये वरिष्ठांना कुठल्याही प्रकारे लेखी कळविले नाही.

**३.** मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम २९ प्रमाणे कर्तव्यावर हजर होणेबाबत किंवा हजर न होण्याचे कारण कार्यालयास कळविणेबाबत नोटीस देवूनही तसे केले नाही.

**४.** आजारी असल्यास त्यावर कोणत्या रुग्णालयात व काय उपचार घेत होता हे गैरहजर कालावधीत कार्यालयास वेळोवेळी अवगत करणे आवश्यक असताना अथवा इतर काही अडचणी असल्यास तसे कार्यालयास अवगत करणे आवश्यक असतांना तसे केले नाही.

**५.** आपल्या गैरहजर राहण्यामुळे निरनिराळे बंदोबस्त,कायदा व सुव्यवस्था राखणेकामी आपले सहकारी कर्मचा-यांवर कामाचा जादा ताण पडणार आहे याचे भान ठेवून आपल्या कर्तव्यावर हजर होणे आवश्यक असताना तसे केले नाही.

**६.** कर्तव्यावर गैरहजर राहून कर्तव्याप्रती आपण किती निष्काळजी व बेफिकिर आहोत याचे प्रदर्शन करुन पोलीस दलास न शोभणारे वर्तन केले असल्याचे दिसून आले आहे.

तुम्ही केलेल्या बेशिस्त व बेजबाबदार वर्तनाबद्दल तुमच्याविरुध्द विभागीय चौकशी करुन तुमच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप विभागीय चौकशीमध्ये निर्विवाद सिध्द झाल्याने, तुम्हांला वरील संदर्भ क्रमांक-१ अन्वये "सक्तीने सेवानिवृत्त का करु नये " अशी शिक्षा प्रस्तावित करणारी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीशीला तुम्ही संदर्भ क्रमांक-२ अन्वये सादर केलेले उत्तर व दिनांक १९/१२/२०१७ रोजी समक्ष म्हणणे मांडणेकामी दिलेल्या संधीच्या वेळी,कौंटुबिक अडचणी,सासूचे आजारपण व मुलांचे शिक्षण या संदर्भात हकिगत कथन करुन, एक वेळ संधी मिळणेबाबत विनंती केली आहे. तसेच माहे ०४/२०१५ ते आजतागायत तुम्ही तुमचे कर्तव्य व्यवस्थित करित असल्याचे, पोलीस अधीक्षक, बीड यांनी सादर केलेल्या गैरहजेरीबाबतच्या अहवालावरुन दिसून येत आहे. तरी यापुढे कर्तव्यात सुधारणा झाली नाही तर तुम्हांस नोकरीतून कमी करण्यात येईल.अशी आज्ञांकित कक्षात समज देण्यात आलेली आहे.

मपोहवा/यंचा/वर्षा सुरेश साळुंके,नेमणूक पोलीस बिनतारी संदेश विभाग,बीड यांना दिलेली कारणे दाखवा नोटीस,त्यांनी नोटीसीला दिलेले उत्तर, तसेच प्रत्यक्ष मुलाखतीमध्ये कथन केलेली त्यांची कौटुबिक

अडचण व त्यांची एकूण सेवा इत्यादी बाबी विचारात घेता कारणे दाखवा नोटीसीमध्ये "सक्तीने सेवानिवृत्त का करु नये" या प्रस्तावित केलेल्या शिक्षेमध्ये बदल करण्यात येत असुन, खालीलप्रमाणे शिक्षेचे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**अं ति म आ दे श** :-

तुम्ही मपोहवा/यंचा/वर्षा सुरेश साळुंके, नेमणूक पोलीस बिनतारी संदेश विभाग, बीड तुमच्या बेशिस्त वर्तनाबद्दल तुम्ही मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ नुसार शिक्षेला पात्र झालेला आहात आणि याच नियमाच्या पोटनियम क्रमांक ५ नुसार, मी रितेश कुमार,अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश,पुणे आम्हांला दिलेल्या अधिकारांचा वापर करुन,तुमची **"पुढील देय वेतनवाढ तीन वर्षासाठी स्थगित ठेवण्याची (भावी काळातील वेतनवाढीवर परिणामकारक होईल**)"ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर शिक्षेच्या मुदतीत तुम्ही नैमित्तीक रजा वगळता अन्य प्रकारच्या रजा उपभोगल्यास शिक्षेचा कालावधी हा तेवढया दिवसांनी पुढे जाईल.

सदर शिक्षेविरुध्द अपिल करावयाची तुमची इच्छा असल्यास हे आदेश प्राप्त झाल्या तारखेपासून ६० दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रासह मार्फतीने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दोन प्रतीत अपील अर्ज सादर करु शकता.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.जा.क्र. आस्था-१/ई-२/अंतिम आदेश/ मयंचा- श्रीमती साळुंखे/२०१८ /६६६ दि. २९/०१/२०१८**

**२.** खालील नमूद कर्मचारी यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेली कर्तव्यावर असतांना नेमुन दिलेल्या कर्तव्यात कसुरी केलेली आहे.

**१) कसुरदार क्र. १ पोहवा (यं.चा.) :- श्री. एस.ए. वालोकर नेमणुक लोहमार्ग नागपूर** यांनी दिनांक ०२/०२/२०१७ रोजी १३०० ते २००० **कर्तव्य** असतांना बि.सं. क्र. हा सर्व स्थानकास पाठविले आहे. परंतू सदरचा संदेश उच्च कंपण स्थानकाव्दारे न प्रक्षेपित करता अन्य मार्गानी केलेला आहे. त्यामुळे मतका सनियंत्रण स्थानकाचे अभिलेख नोंदीवरुन दिसुन येते असल्यामुळे दोषी आहेत.

२) **कसुरदार क्र.२ पोहवा / बियंचा श्रीमती पी.जे. महाजन** यांनी बि.सं.क्र. १० हा दिनांक ०३/०२/२०१७ रोजी १३०० ते २००० वा दरम्यान तसेच दिनांक २२/०२/२०१७ रोजी बि.सं.क्र. ८१ हा १३०० ते २००० च्या दरम्यान उच्चकंपन वाहिनीवर पाठविण्यात आले परंतू सदरचा संदेश उच्च् कंपन स्थानकाव्दारे व प्रक्षेपित करता अन्य मार्गानी केलेला आहे. त्यामुळे मतका सनियंत्रण स्थानकाचे अभिलेख नोंदीवरुन दिसुन येत असल्यामुळे दोषी आहेत.

३) **कसुरदार क्र.३ :- पो.हवा./ बि.यं.चा श्री. वाय.एम. उमरेडकर** यांनी दिनांक १५/०२/२०१७ रोजी १३०० ते २००० वा दरम्यान बि.सं. क्र. ५८ चे फक्त अड्रेस सेक्शन प्रक्षेपित केला, त्यानंतर मजकूर प्रक्षेपित केले नाही. इतर मार्गानी पाठविण्यात आला आहे. त्यामुळे मतका सनियंत्रण स्थानकाचे अभिलेख नोंदीवरुन दिसुन येते असल्यामुळे दोषी आहेत.

४) **कसुरदार क्र. ४ पोहवा/बियंचा श्री.ए.पी.सोरते** :- यांनी दिनांक २३/२/२०१७ रोजी नागपूर लोहमार्ग उच्चकंपन स्थानकात दुपारपाळी कर्तव्यावर असतांना बि.सं.क्र, १२ हा संदेश १८०० वा लघू हाक घेऊन १९००

नांदेड, मनमाड, औरंगाबाद व ईगतपुरी खेरीज इतर स्थानकांना १९०० वाजेपर्यंत बंदचा आदेश दिल्यानंतर वाहिनीवर काहीही प्रक्षेपण केल्याचे दिसुन येत नाही. हे म.त.का. सनियंत्रण स्थानकाचे अभिलेखातील नोंदी वरुन दिसुन येते.

मजकूर सदर प्रकरणामध्ये अ.क्र. १ ते ४ यांनी उच्चकंपन वाहिनीवर संदेश प्रक्षेपित न करता इतर मार्गाने संदेश प्रक्षेपित केले असल्याचे पो.नि. मतका पुणे यांनी कळविले आहे. संदेश चॅनेलवर प्रक्षेपित करणेबाबत पो.नि. लोहमार्ग नागपुर यांनी संबंधितांना सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार अ.क्र. १ ते ४ यांनी कर्तव्यात चुक केली आहे. त्यांनी केलेल्या चुकीमुळे बिनतारी संदेश कार्यप्रणाली भंग झाला असल्याने केलेल्या कसुरीबद्दल खालील शिक्षा देण्यात येते.

## आदेश

मी, ई.दा.कांबळे, पोलीस अधिक्षक बि.सं. , पूर्व विभाग नागपूर , पोलीस नियमावली भाग-१ नियम ४३८/३/1 व २ तसेच मा. संचालक पोलीस बि.सं. म.रा. पुणे यांचे जावक क्र. सी/३/३४९ /मतका/१९९३ दिनांक ६/1/१९९४ मधील तरतुदीनुसार अधिकांराचा वापर करुन केलेल्या कसुरीमुळे बिनतारी संदेश कार्यप्रणाली भंग केल्याचे दोषी आढळुन आले असल्याने कसुरदार क्र. १ ते ४ यांना ''**समज**'' ही शिक्षा देत आहे.

**(पोलीस अधिक्षक बि.सं. पूर्व विभाग यांचे आदेश क्र.कई-१/वा.प्र.१३/डाटा/टी-०५/२०१७/२२८**
**दि. २७/०१/२०१८)**

*७. निधनः- निरंक*

८. ***संकीर्ण*** **:-** आश्र्वाशित प्रगती योजना

१. **संदर्भ** :- १.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ०८/०६/१९९५, महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक
२. वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा ३, दिनांक २०/०७/२००१,
३. वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३, दिनांक ३१/०८/२००९
४. वेतन-११०९/प्र.क्र.४४/ सेवा ३, दिनांक ०१/०४/२०१०
५. वित्ता विभाग क्र आप्रयो/१०१४/प्र.क्र.२१/सेवा ३, दि.६ सप्टेंबर,२०१४
६. पुरकपत्र क्र.आप्रयो-१०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.१० फेब्रुवारी, २०१५.

**आदेशः-**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय अनु.क्र. १, अन्वये गट ''क'' व ''ड'' मधील कर्मचायांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची दिनांक ०१ ऑक्टोबर १९९४ पासून अंमलात आलेली कालबध्द पदोन्नतीची योजना उपरोक्त संदर्भ अनु. क्र. २, च्या शासन निर्णयानुसार सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजना दिनांक ०१ ऑगस्ट २००१ पासून लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजना ''सुधारित सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजना'' या नावाने दिनांक ०१/१०/२००६ पासून अंमलात येणेसाठी महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडून उपरोक्त संदर्भ अनु. क्र. ३, अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर ''सुधारित संवोतर्गत आश्र्वासित प्रगती योजना'' कमाल वेतन बँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००)+ ५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणा-या कर्मचा-यांना लागू राहणार असलेने पात्र कर्मचा-यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे. कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजनेखाली कर्मचा-यांनी घेतलेला

लाभ हा या योजनेखाली त्या कर्मचा-यांचा पहिला लाभ समजण्यात येईल. पहिल्या लाभानंतर १२ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचा-यांस पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दूसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने उपरोक्त संदर्भ अनु. क्र. २, अन्वयेनिर्गमित शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधिन पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असलेल्या पोलीस बिनतारी विभागामधील गट ''क'' व ''ड'' मधील कर्मचारी यांनी पहिल्या लाभानंतर १२ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या व उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णय अनु.क्र. ४, अन्वये खालील नमुद बिनतारी कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दूसरा लाभ म्हणून त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून मंजूर करण्यात येत आहे. सदर लाभ मंजूर करताना उपरोक्त संदर्भ अनु.क्र. ३ चे शासन निर्णयामधील अनुक्रमांक २ (१) मध्ये नमूद प्रमाणे पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असलेल्या खालील अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदाचा वेतनबँड मंजूर करण्यात यावा. या वेतन बँड मधील वेतन, संबंधित कर्मचाऱ्यांस योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी अनुज्ञेय असलेल्या वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर ३ टक्के वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करण्यात यावी.

| **संवर्ग :- पोलीस उप-निरीक्षक (अभि)** | | |
|---|---|---|
| सध्याचा वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु. ९३००- ३४८००/- ग्रेड वेतन रू. ४३०० |
| दुस-या लाभाचा देय वरिष्ठ वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु. ९३००- ३४८०० /- ग्रेड वेतन रु.५००० |

| **अ. क्र.** | **बिनतारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा** | **नेमणूक** | **सु.से.आ.प्र. योजनेअंतर्गत दुसरा लाभ देय दिनांक** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | श्री.सतिश गंगाराम चोडणेकर<br>पोलीस उप-निरीक्षक,बि.सं.(अभि) | पुनःप्रक्षेपण केंद्र, मुंबई | १४/०१/२०१६ |
| २ | श्री.विलास पांडुरंग पदे<br>पोलीस उप-निरीक्षक,बि.सं.(अभि) | औरंगाबाद शहर | १४/०१/२०१६ |

| **संवर्ग :- सहा.पोलीस उप-निरीक्षक (रेडिओ यांत्रिकी) रु.५२००-२०२००-ग्रे.वे.२८००/-** | | |
|---|---|---|
| सध्याचा वेतनबँड व ग्रेड वेतन (पहिल्या लाभांतर्गत) | :- | रु. ९३००/- -. ३४८००/- ग्रेड वेतन रू. ४३००/- |
| दुस-या लाभाचा देय वरिष्ठ वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु. ९३००/- -. ३४८००/- ग्रेड वेतन रू. ५०००/- |

| **अ. क्र.** | **बिनतारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा** | **नेमणूक** | **सु.से.आ.प्र. योजनेअंतर्गत दुसरा लाभ देय दिनांक** |
|---|---|---|---|
| १ | श्री.राजु सदाशिव मते<br>सहा.पोलीस उप-निरीक्षक (रेडिओ यांत्रिकी) | नागपूर ग्रामीण | ०६/०७/२०१७ |
| २ | श्री. राजेश जयवंत कदम<br>सहा.पोलीस उप-निरीक्षक (रेडिओ यांत्रिकी) | बि.सं.वि.मुंबई शहर | ०९/०७/२०१७ |
| ३ | श्री.प्रकाश बाबुराव सुतार<br>सहा.पोलीस उप-निरीक्षक (रेडिओ यांत्रिकी) | बि.सं.वि.मुंबई शहर | ०५/०७/२०१७ |
| ४ | श्री. प्रेमदास आंबादास खोब्रागडे<br>सहा.पोलीस उप-निरीक्षक (रेडिओ यांत्रिकी) | रा.रा.पो.बल गट क्र.४<br>नागपूर | २३/०३/२०१७ |

| **संवर्ग :- सहा.पोलीस उप-निरीक्षक (प्रमुख यंत्रचालक)** | | |
|---|---|---|
| सध्याचा वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु. ५२००/- -. २०२००/- ग्रेड वेतन रू. २८००/- |
| दुस-या लाभाचा देय वरिष्ठ वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु. ९३००/- -. ३४८००/- ग्रेड वेतन रू. ४३००/- |

| अ. क्र. | बिनतारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | नेमणूक | सु.से.आ.प्र. योजनेअंतर्गत दुसरा लाभ देय दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री.दत्तात्रय रामचंद्र टावरे सपोउपनि/प्र.यं.चा. | मुख्य नियंत्रण कक्ष,मुंबई | ०१/०८/२०१६ |
| अ. क्र. | बिनतारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | नेमणूक | सु.से.आ.प्र. योजनेअंतर्गत दुसरा लाभ देय दिनांक |
| २ | श्री.सुर्यकांत गणपतराव कुंभार सपोउपनि/प्र.यं.चा. | मलबार हिल,मुंबई | २०/०५/२०१७ |
| ३ | श्री.राजेंद्र मुगुटराव कदम सपोउपनि/प्र.यं.चा. | पु.नि.क.चेंबूर | ०१/०७/२०१६ |
| ४ | श्री.कमरुद्दीन ताजुद्दीन शेख सपोउपनि/प्र.यं.चा. | अहमदनगर | ०५/०८/२०१६ |

१ वर नमूद कर्मचा-यांची रकाना क्रमाकं ४ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून म.ना.से.(वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (१) अ प्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी.

२ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दिनांक १/१०/२००६ पासून लागू राहील. परंतु १/१०/२००६ ते ३१/०३/२०१० पर्यंत काल्पनिक वेतननिश्चिती करण्यात यावी. मात्र सदर कालावधीतील थकबाकी अनुज्ञेय असणार नाही. प्रत्यक्ष लाभ दिनांक ०१/०४/२०१० पासून रोखीने देणेबाबत कार्यवाही घेण्यात यावी.

३ वरील कर्मचा-यांना दुसरा लाभ मंजूर केल्यानंतर पहिल्या लाभा प्रमाणेच पदोन्नतीच्या नियमांनुसार विहीत मुदतीत विकल्प देण्याची मुभा देऊन वेतननिश्चिती करण्यात यावी. तशा आशयाचे बंधपत्र संबंधित कर्मचायांकडून लिहून घ्यावे. पदोन्नतीनंतर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

४ या पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्य यात वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे वेतन निश्चितीत लाभ देण्यात येईल, मात्र वेतननिश्चितीत मिळालेला लाभ त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (Functional) पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

५ पहिल्या लाभांतर्गत पदोन्नतीच्या ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत, दुसरा लाभ मंजूर करण्यासाठी, त्याला ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे त्या पदावरील पदोन्नतीसाठी विहित केलेली गोपनीय अहवालांची सरासरी प्रतवारी ''ब+'' (निश्चित चांगली) असलेबाबत पडताळणी करण्यात आली आहे.

६ दुसरा लाभ मंजूर केल्यानंतर ६ वर्षांनी कर्मचा-याच्या गोपनीय अहवालाची तपासणी करण्यात यावी. या वर्षातील त्याच्या गोपनीय अहवालातील अनुकुल असलेल्या ३ गोपनीय अहवालांची सरासरी दुस-या लाभाच्या प्रकरणी ''ब+'' (निश्चित चांगली) असणे आवश्यक राहील. गोपनीय अहवालांची ही सरासरी प्रतवारी प्राप्त न केल्यास तसेच कर्मचारी वैदयकीय अथवा अन्य कारणास्तव अपात्र ठरल्यास मंजूर करण्यात आलेला यथास्थिति दुसरा लाभ काढून घेण्यात यावा व अशा लाभांची वसूली करण्यात येऊ नये.तसेच या योजनेखाली पहिला/दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात यावेत.

७ या योजनेअंतर्गत पदोन्नती मिळाली तरी कर्मचायाचे नांव कनिष्ठ (मुळ) संवर्गाच्या ज्येष्ठता सूचित राहील आणि सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसार उपलब्ध रिक्ततेत योग्यवेळी नियमित पदोन्नतीसाठी त्यांचा विचार करण्यात येईल. नियमीत पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या किंवा नियमित पदोन्नती नाकारलेल्या कर्मचायांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

८ संबंधित कर्मचायाचा पहिला लाभ काढून घेतला असेल तर त्यानंतरच्या पुढील प्रत्येक वर्षी त्याचा पहिला

लाभ मंजूर करण्यासाठी विचार करण्यात यावा अशा कर्मचाऱ्याचा थेट दुसऱ्या लाभासाठी विचार केला जाणार नाही.

उपरोक्त पात्र पोलीस बिनतारी अधिकारी/कर्मचारी यांना सदर योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय असला तरी संबंधित घटक प्रमुखांनी संबंधित कर्मचारी यांचेविरुध्द काही विभागीय चौकशी प्रलंबीत अथवा प्रस्तावित केली असल्यास किंवा त्यांचे विरुध्द कोणतेही न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यास किंवा त्यांचेविरुध्द काही गुन्हा नोंद असल्यास सदर योजनेअंतर्गत लाभ देऊ नयेत .तसेच संबंधित अधिकारी कर्मचारी यांचेकडून त्यांचे मत्ता दायित्व विवरणपत्र प्राप्त करुन घेऊन त्यानंतरच त्यांची वेतननिश्चिती करणेत यावी.

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७/ सु.आ.प्र.यो.-२४/२०१८/७३८, दि. ३१/०१/२०१७ )**

२. **संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक -

एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ०८/०६/१९९५.
महाराष्ट्र शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक -

२) वेतन-१९९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २०/०७/२००१
३) वेतन-११०९/प्र.क्र.४३/सेवा-३, दिनांक ३१/०८/२००१
४) वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक ०१/०४/२०१०
५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.६ सप्टेंबर २०१४
६) पुरकपत्र क्र. आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.१० फेब्रुवारी, २०१५
७) शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र. वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा -३ दि. ०९डिसेंबर २०१६
८) शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र. वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा -३ दि. ११ मे २०१७

**आदेशः-**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय अनु.क्र. १, अन्वये गट ''क'' व ''ड'' मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची दिनांक ०१ ऑक्टोबर १९९४ पासून अंमलात आलेली कालबध्द पदोन्नतीची योजना उपरोक्त संदर्भ अनु. क्र. २, च्या शासन निर्णयानुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दिनांक ०१ ऑगस्ट २००१ पासून लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ''सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना'' या नावाने दिनांक ०१/१०/२००६ पासून अंमलात येणेसाठी महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडून उपरोक्त संदर्भ अनु. क्र. ३, अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर ''सुधारित संवोतर्गत आश्वासित प्रगती योजना'' कमाल वेतन बँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००)+ ५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणा-या कर्मचा-यांना लागू राहणार असलेने पात्र कर्मचा-यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे. कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली कर्मचा-यांनी घेतलेला लाभ हा या योजनेखाली त्या कर्मचा-यांचा पहिला लाभ समजण्यात येईल. पहिल्या लाभानंतर १२ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचा-यांस पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दूसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने उपरोक्त संदर्भ अनु. क्र. २,३, ४ अन्वये निर्गमित शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधिन पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असलेल्या पोलीस बिनतारी विभागामधील अधिकारी कर्मचारी यांनी पहिल्या लाभानंतर १२ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या व उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णय अ.क्र. ४ अन्वये खालील नमूद बिनतारी कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दूसरा लाभ म्हणुन त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या दिनांकापासून मंजूर करण्यात येत आहे.

सदर लाभ मंजूर करताना उपरोक्त संदर्भ अ.क्र. ७ व ८ चे शासन निर्णयामधील तरतुदीनुसार वेतननिश्चिती करण्यात यावी.

| संवर्ग :- सपोउनि / प्रयंचा | | | |
|---|---|---|---|
| सध्याचा वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु. ५२००- २०२००/- ग्रेड वेतन रू. २८०० | |
| दुस-या लाभाचा देय वरिष्ठ वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु. ९३००- ३४८०० /- ग्रेड वेतन रु.४३०० | |
| **अ. क्र.** | **बिनतारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा** | **नेमणूक** | **सु.से.आ.प्र. योजनेअंतर्गत दुसरा लाभ देय दिनांक** |
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | श्री.श्रीमंत रानबा गायकवाड<br>पोलीस उपनिरीक्षक, बि.सं. (वाहतुक) | लातूर | ०१/१०/२००६ |

| संवर्ग :- सहा.पोलीस उप-निरीक्षक / प्रमुख यंत्रचालक | | |
|---|---|---|
| सध्याचा वेतनबँड व ग्रेड वेतन (पहिल्या लाभांतर्गत) | :- | रु. ५२००/- -. २०२००/- ग्रेड वेतन रू. २८००/- |
| दुस-या लाभाचा देय वरिष्ठ वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु. ९३००/- -. ३४८००/- ग्रेड वेतन रू. ४३००/- |

| **अ. क्र.** | **बिनतारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा** | **नेमणूक** | **सु.से.आ.प्र. योजनेअंतर्गत दुसरा लाभ देय दिनांक** |
|---|---|---|---|
| १ | श्री.अनिल शंकर शेळके<br>सहा. पोलीस उप-निरीक्षक / प्रमुखयंत्रचालक | रा.रा.पो.बल गट क्र. २ , पुणे | २७/१२/२००६ |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग , शा.नि.क्र. वेतन -१११११/प्र.क्र.८/सेवा-३, दि. १ जुलै , २०११ मध्ये मुद्दा क्र.१ समोरील स्पष्टीकरण ''सेवेत कार्यरत असताना पदोन्नती न मिळल्यामुळे निर्माण झालेली कुंठितता घालविण्याचा योजनेचा उद्देश आहे. त्यामुळे जरी पूर्वलक्षी प्रभावाने योजना लागूकेली असली तरी आदेशाच्या दिनांकाला जे सेवेत कार्यरत आहेत . त्यांनाच या योजनेचे लाभ अनुज्ञेय करण्याचा निर्णय घेतलेला आहे. म्हणुन दि. ०१/१०/२००६ ते ३१/०३/२०१० या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना या योजनेअंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय नाही'' असे नमुद केलेले असलेने यापूर्वी नमूद अधिकारी /कर्मचारी यांना आश्र्वासित प्रगती योजनेचे लाभ अनुज्ञेय करणेत आलेले नाही.

शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग , क्र. वेतन ११११/ प्र.क्र.-८/सेवा-३/दि. ९डिसेंबर २०१६ मध्ये असे नमुद केले आहे की, दि. १ जुलै २०११ च्या शासन निर्णयासोबतच्य परिशिष्ठ ''अ'' मधील मुद्दा क्र. १ समोरील स्पष्टीकरण र-करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने जे अधिकारी / कर्मचारी हे ०१/१०/२००६ ते ३१/३/२०१० या दरम्यान शासन सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत अथवा ज्यांचे शासन सेवेत कार्यरत असताना सदर कालावधी दरम्यान निधन झाले आहे. त्यांच्याकडुन सुधारीत सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूरी बाबतच्या अटींची पुर्तता झाल्यानंतर त्यांना वेतननिश्चिताचा प्रत्यक्ष लाभ हा फक्त निवृत्तीवेतन विषयक /कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभांकरीताच म्हणेजच निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन , सेवानिवृत्ती उपदान / मृत्यु उपदान तसेच रजा रोखीकरण या लाभ मंजुरीच्या प्रयोजनार्थ अनुज्ञेय राहील. संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना दुसरा लाभ मंजूरीच्या अनुषंगाने थकबाकीची रक्कम अनुज्ञेय राहनार नाही. नमूद अधिकारी / कर्मचारी यांचे वेतननिश्चिती बाबत क्र. वेतन ११११/प्र.क्र. ८/ सेवा -३ दि. ११ मे २०१७ अनुषंगाने योग्य ती कार्यवाही घेण्यात यावी.

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७/ से.नि.कर्म/सु.आ.प्र.यो.-२४/२०१८/७३५, दि. ३१/०१/२०१७ )**

३. **संदर्भ :-** महाराष्ट्र शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक -

१) एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ०८/०६/१९९५.
२) एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ०१/११/१९९५.
३) एसआरव्ही-०१९६/३५७८/९५/बारा, दिनांक २७/११/१९९६
४) एसआरव्ही-०१९६/३३/९५/बारा, दिनांक २७/०३/१९९७

महाराष्ट्र शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक -

५) वेपूर-१२९८/प्र.क्र.१३/९८/सेवा-१०, दिनांक १०/१२/१९९८
६) वेतन-१९९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २०/०७/२००१
७) वेतन-२०००/प्र.क्र.१०/९९/सेवा-३, दिनांक ०३/०८/२००१
८) वेतन-२००२/प्र.क्र.१/९९/सेवा-३, दिनांक ११/०१/२००१
९) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.६ सप्टेंबर २०१४
१०) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.१० फेब्रुवारी, २०१५

**आदेशः-**

उपरोक्त संदर्भान्वये खालील नमुद महाराष्ट्र राज्य पोलीस बिनतारी विभागामधील अधिकारी व कर्मचारी यांनी पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली अर्हता पूर्ण केल्याने तसेच त्यांनी सलग १२ वर्षे एकाच पदावर सेवा पूर्ण केल्यामुळे व त्यांना पुढील पदोन्नतीची संधी अदयाप न मिळाल्यामुळे उपरोक्त नमुद शासन निर्णयातील तरतुदींनुसार त्यांना नियमित १२ वर्षाचे सेवेनंतर वरच्या पदाच्या पदोन्नतीच्या साखळीतील वेतनश्रेणी देय असल्याने त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी खालील नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

| **संवर्ग :- पोलीस उप निरीक्षक , बि.सं.(अभि)** | | |
|---|---|---|
| सध्याचा वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु. ९३००/- -. ३४८००/- ग्रेड वेतन रू. ४३००/- |
| दुस-या लाभाचा देय वरिष्ठ वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु. ९३००/- - ३४८०० /- ग्रेड वेतन रु.५०००/- |

| अ.क्र | बिनतारी कर्मचा-यांचे नांव व हुा | नेमणुक | सध्याच्या पदावरील नियुक्तीचा दिनांक | सु.से.आ.प्र.योजनेअंतर्गत पहिला लाभ देय दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.सतिश लक्ष्मण जावळे पोलीस उप निरीक्षक, बि. सं. (अभि) | गडचिरोली | ०७/०५/२००४ पो.उप.नि.अभि | ०७/०५/२०१६ | सध्याच्या पदावर सलग १२ वर्षे सेवा पूर्ण होत असलेने |

| **संवर्ग :- सहा.पोलीस उप-निरीक्षक (रेडिओ यांत्रिकी)** | | |
|---|---|---|
| सध्याची वेतनश्रेणी (वेतनबँड व ग्रेड वेतन) | :- | रु.५२००/--२०२००/- + ग्रेड वेतन रु.२८००/- |
| आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिल्या लाभाची देय वेतनश्रेणी (वेतनबँड व ग्रेड वेतन | :- | रु.९३००/--३४८००/- + ग्रेड वेतन रु.४३००/- |

| **अ.क्र** | **बिनतारी कर्मचा-यांचे नांव व हुा** | **नेमणुक** | **सध्याच्या पदावरील नियुक्तीचा दिनांक** | **सु.से.आ.प्र. योजनेअंतर्गत पहिला लाभ देय दिनांक** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.मुकुंद आनंदराव पत्की सपोउनि/रे.यां. | अकोला | ०८/०७/१९९३ रेडिओ यांत्रिकी | ०२/१०/२०१६ | वर्ग १ परिक्षा उत्तीर्ण झाले दिनांका पासून |
| २ | श्री.जुनेद सादिक सिदीकी सपोउनि/रे.यां./९२३ | सांताक्रूझ,मुंबई | २५/०२/२००४ रेडिओ यांत्रिकी | २५/०२/२०१६ | सध्याच्या पदावर सलग १२ वर्षे सेवा पूर्ण होत असलेने |
| ३ | श्री.बाळकृष्ण संभाजी शिंदे सपोउनि/रे.यां. | सांताक्रूझ,मुंबई | ०१/०९/१९९५ रेडिओ यांत्रिकी | २१/१०/२०१६ | वर्ग १ परिक्षा उत्तीर्ण झाले दिनांका पासून |

२/- वरील नमुद अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासंबंधी योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाली तरी सदर अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे मुळ ज्येष्ठता सूचित राहतील आणि सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार उपलब्ध रिक्त पदामध्ये योग्यवेळी नियमित पदोन्नतीसाठी (Functional Promotion) त्यांचा विचार करण्यात येईल.

३/- नियमित पदोन्नतीसाठी अपात्र ठरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांस या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्याचप्रमाणे नियमित पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यांस देखील या पदोन्नतीचा लाभ देय होणार नाही व त्यांचे या योजनेअंतर्गत लागू करण्यात आलेली वेतनश्रेणी काढून घेण्यात येईल.

४/- तसेच नमुद कर्मचाऱ्यांना विकल्प दयावयाचा असल्यास त्यांचेकडून विहित मुदतीत विकल्प घेऊन त्याप्रमाणे वेतन निश्चिती करावी. तशा आशयाचे बंधपत्र संबंधित कर्मचाऱ्यांकडून लिहून घ्यावे.

५/- संबंधित आस्थापना अधिकारी यांनी नमुद कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात तशी नोंद घेऊन त्यांची वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करावी व पूर्तता अहवाल कृपया या कार्यालयास पाठवावा.

६/- उपरोक्त नमूद पोलीस बिनतारी अधिकारी / कर्मचारी यांना सदर योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय असले तरी संबंधित घटक प्रमुखांनी संबंधित बिनतारी अधिकारी / कर्मचारी यांचेविरूध्द काही विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित केली असल्यास किंवा त्यांचेविरूध्द कोणतेही न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यास किंवा त्यांचेविरूध्द काही गुन्हा नोंद असल्यास सदर योजनेअंतर्गत लाभ देऊ नयेत .

७/- सदर आदेशामधील ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली नाहीत अशा अधिकारी/कर्मचारी यांची जात वैधता प्रमा प्राप्त करुन घेऊन तद्नंतर त्यांचे आश्वासित प्रगती योजनेसंदर्भाने पुढील योग्य ती कार्यवाही घ्यावी.

८/- सदर आदेशामधील ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांची मत्ता दायित्व विवरणपत्र सादर केलेली नाहीत अशा अधिकारी/कर्मचा-यांकडून मत्ता दायित्व विवरणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतरच त्यांना सदरचे लाभ अनुज्ञेय करणेची कार्यवाही घेण्यात यावीत.

९/- सदर आदेशातील नमुद अधिकारी/कर्मचारी यांना सदर पदोन्नतीबाबत काही शंका/ अडचण /दुरुस्ती/ जातवैधता प्रमाणपत्र सादर करावयाचे असल्यास त्यांनी त्यांचे अर्ज थेट या कार्यालयास सादर न करता ते पोलीस अधीक्षक पुर्व विभाग नागपूर/ पश्चिम विभाग पुणे व पोलीस उप आयुक्त , मुंबई यांचे मार्फतीनेच या कार्यालयास सादर करावेत. थेट प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधितांना समज देणेत यावी.

१०/- **श्री.शंकर विठोबाजी लांभाते, सपोउनि/रेयां, ने.नागपूर परिक्षेत्र** यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याने त्यांना आश्वासित प्रगती योजनेचे प्रथम लाभाकरीता तात्पुरते अपात्र ठरविण्यात आलेले आहे. श्री.लांभाते यांचेकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर यथावकाश त्यांचे आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देणेबाबतची कार्यवाही घेणेत येईल.

( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७/ ७१०/आ.प्र.यो./१२ वर्षे /२०१८/७३६, दि. ३१/०१/२०१७ )

४. पोलीस हवालदार (वीजतंत्री) भागवत निनू पिवतकर नेमणुक बि.सं.वि. अमरावती ग्रामीण हे दिनांक १३/१२/१९८८ रोजी पोलीस हवालदार (वीजतंत्री) या पदावर "महादेव कोळी( अनुसूचित जमाती) " या जात प्रमाणपत्रावर अनुसूचित जमाती प्रवर्गातून सेवेत नियुक्त झाले आहेत. त्यांनी " कोळी ४(१) (विशेष मागास प्रवर्ग) चे जात प्रमाणपत्र सादर केले आहे.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६ ब, दिनांक १५/०६/१९९५ व शासन निर्णय क्र.बीसीसी -२००४/प्र.क्र. ४५/०४/१६-ब दिनांक ३०/०६/२००४ अन्वये, ज्या बिगर आदिवासींनी जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५/०६/ १९९५ पुर्वी शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविली आहे. त्यांना सेवेतुन काढुन टाकण्यात येऊ नये. किंवा पदावनत करु नये.ते ज्या घटकाचे आहेत त्या घटकात दाखविण्यात यावेत. यापुढे त्यांना त्या त्या प्रवर्गात आरक्षणाचे फायदे देय राहतील .वरील संरक्षण हे दिनांक १५/०६/१९९५ पुर्वी नियुक्त झालेल्या अधिकारी /कर्मचारी यांना देय राहील. वरील संरक्षित केलेल्या बिगर आदिवासी अधिकारी / कर्मचारी यांची सेवाज्येष्ठता दिनांक १३/१२/१९९५ अशी विचारात घ्यावी अशी तरतुद आहे.

३. श्री. भागवत निनु पिवतकर यांची पोलीस हवालदार (वीजतंत्री) पदावर भरती दिनांक १३/१२/१९८८ असल्याने त्यांना उपरोक्त शासन निर्णयानुसार संरक्षण प्राप्त होत आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार त्यांना पोलीस हवालदार (वीजतंत्री) पदावर विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गात दर्शवुन त्यांचा सेवाज्येष्ठता दिनांक १३/१२/१९८८ ऐवजी दिनांक १५/०६/१९९५ असा नियमित करण्यात येत आहे.

४. पोलीस हवालदार (वीजतंत्री) यांच्या दिनांक ०१/०१/२०१७ रोजीच्या सेवाज्यष्ठेता यादीमध्ये, उपरोक्त सुधारीत ज्येष्ठतेनुसार श्री.पिवतकर यांचा पुर्वीचा ज्येष्ठता क्रम ३८ रद्द करुन त्यांची सुधारीत सेवाज्येष्ठता खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| दि. १/१/१७ चे सेज्ये यादीतील ज्ये.क्र. | पोहवा (वीजतंत्री) यांचे नाव | प्रवर्ग | अ.ज.प्रमाणपत्र वैध न ठरल्याने ज्या प्रवर्गात समाविष्ठ होण्याचा विकल्प दिला आहे तो जात प्रवर्ग | पोहवा(वीजतंत्री) पदी नियुक्ती तारीख | शा.नि.३०/०६/२००४ नुसार सेवाज्येष्ठता निश्चिती नंतरची भरती तारीख |
|---|---|---|---|---|---|
| ६१ | श्री.कांबळे पांडुरंग विष्णु | अ.जा. | --- | १५/०२/१९८५ | --- |
| ६१ अ | श्री.पिवतकर भागवत निनू | अ.ज. | वि.मा.प्र. | १३/१२/१९८८ | १५/०६/१९९५ |
| ६२ | श्री.सांगळे बाबूराव मोतीराम | अ.ज. | वि.मा.प्र. | १७/१२/१९८८ | १५/०६/१९९५ |

अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-४/आस्था -२/ज्ये.सु/पोहवा वितं./दुरुस्ती/२०१८/७२६, दि. ३०/०१/२०१८ )

देनांक : /०३/२०१८

( चं.अ.ढाकणे )
पोलीस अधीक्षक, बि.सं. (मुख्या.),
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश, म.रा.पुणे, यांचे कार्यालय